पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक: नस/९/कावि/ ४३ /२०१५
दिनांक : ११ /०२/२०१५

प्रति,

मा. ...................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/०२/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी - २०१५ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०/०२/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.</u>**

## सूचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये )

**<u>कार्यपत्रिका क्रमांक ४०</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे फेब्रूवारी-२०१५ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०/०२/२०१५ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

------

अ) मा.महापालिका सभा क्रमांक - ३८ दिनांक २०/१२/२०१४ व २३/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

**<u>नियुक्त्या</u>**

**विषय क्रमांक १)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर ८ (आठ) मा.सदस्यांच्या नियुक्त्या कलम ३१अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे.

-------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

----------

## मा.स्थायी समितीचे ठराव

**विषय क्रमांक २)** संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/६/कावि/२०४४/१५ दि.१२/१/२०१५

२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०४७२ दि. १३/०१/२०१५

शिक्षण मंडळाचे सन २०१४-२०१५ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु.१०९,९८,९९,०००/- चे व सन २०१५-२०१६ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.११०,९६,५०,०००/- मान्यतेकामी सादर केलेले असल्याने त्यास तसेच शिक्षण मंडळासाठी पुढीलप्रमाणे तरतुदीमध्ये वाढ करणेबाबत विनंती आहे.

शिक्षण मंडळाचे सन २०१४-१५ चे सुधारीत अंदाजपत्रक - तरतुदीमध्ये वाढ करावयाचा तपशिल

| अ.क्र. | लेखाशिर्ष | वाढ र.रु. |
|---|---|---|
| १) | विद्यार्थी गणवेश | १.२०,००,००० |
| २) | खेळ शाळा गणवेश | ५०,००,००० |
| ३) | पी.टी.गणवेश | ५०,००,००० |
| ४) | सर्वांगिण शैक्षणिक गुणवत्ता व विकास | ५,००,००० |
| ५) | विजरोधक यंत्रणा | १,००,००,००० |
| ६) | शिष्यवृत्ती | ५,००,००० |
| ७) | शालेय स्वेटर | ५०,००,००० |
| | एकूण वाढ र.रु. | ३,८०,००,००० |

शिक्षण मंडळाचे सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक - तरतुदीमध्ये वाढ करावयाचा तपशिल

| अ.क्र. | लेखाशिर्ष | वाढ र.रु. | कारण |
|---|---|---|---|
| १) | शिक्षक वेतन | ६,००,००,००० | सध्या १०० रिक्त पदे असून जून २०१५ पासून शासनाकडून जादा शिक्षक वर्ग होऊन/नविन नेमणूका होतील, त्यांचे वेतनासाठी व मनपा कर्मचा-यांप्रमाणे शिक्षकांनाही महागाई भत्ता फरक देणेकामी |
| २) | कार्यालय फर्निचर | १,००,००,००० | शिक्षण मंडळ कार्यालयाचे नूतनीकरण करणेकामी |
| ३) | शालेय फर्निचर | १,५०,००,००० | इ.१ली ते ४थी करीता शाळांमध्ये बेंचेस घेणेकामी |
| ४) | शारिरीक शिक्षण व | १०,००,००० | उडी मारण्याची दोरी, डंबेल्स, रबरी रिंग इ. |

| | | | |
|---|---|---|---|
| | साहित्य | | घेणेकामी |
| ५) | विद्यार्थी गणवेश | १,००,००,००० | गणवेश खरेदीकामी |
| ६) | पाट्या व दप्तरे | २०,००,००० | पाट्या व दप्तरे खरेदीकामी |
| ७) | विद्यार्थी कला,क्रिडा व नाट्य स्पर्धा | १०,००,००० | दरवर्षीप्रमाणे स्पर्धा भरविणेकामी |
| ८) | पी.टी.गणवेश | २५,००,००० | पी.टी.गणवेश खरेदीकामी |
| ९) | शालेय स्वेटर | ५०,००,००० | स्वेटर खरेदीकामी |
| १०) | ई-लर्निंग | १,००,००,००० | लॅब तयार करणे, संगणक खरेदी ऑनलाईन कामकाज |
| ११) | विज्ञान प्रदर्शन (सायन्स पार्क) भेट | २०,००,००० | विद्यार्थी सायन्स पार्क भेटीचा खर्च मनपास अदा करणेकामी |
| १२) | विजरोधक यंत्रणा | २,००,००,००० | विज अटकाव यंत्रणा शाळा इमारतींवर बसविणेकामी |
| १३) | घरबांधणी कर्ज | ५,००,००,००० | मनपा कर्मचा-यांप्रमाणे प्राथ. शिक्षकांना घरबांधणी कर्ज देणे |
| १४) | वाहन कर्ज | १,००,००,००० | मनपा कर्मचा-यांप्रमाणे प्राथ.शिक्षकांना वाहन कर्ज देणे. |
| | एकूण वाढ र.रु. | १९,८५,००,००० | |

तसेच शिक्षण मंडळातील शिक्षकांना गृहकर्ज देणेसाठी ररु.१५ कोटी व वाहनकर्ज देणेसाठी र.रु.१ कोटी तरतूद करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ३ )** संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वृ.सं./४/कावि/१६/१५ दि.3/१/२०१५

२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०५७९ दि. ३०/०१/२०१५

मनपाच्या वृक्षप्राधिकरणाचे सन २०१४-१५ चे सुधारीत र.रू.१५,२८,२१,०००/- व सन २०१५-१६ चे मुळ अंदाजपत्रक र.रू.१५,६५,२१,०००/- प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या वृक्ष प्राधिकरण ठराव क्र११ दि.१२/११/२०१४ चे अंदाजपत्रकास तपशिलाप्रमाणे मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ४ )** संदर्भ :- १) मा.रमा ओव्हाळ व मा.अतुल शितोळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०७२७ दि. १०/०२/२०१५

महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळातील निवृत्त प्राथमिक शिक्षकांना मनपा कर्मचाऱ्यांप्रमाणे धन्वंतरी योजनेचा लाभ देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ५ )** संदर्भ:- १) मा.रमा ओव्हाळ व मा.अतुल शितोळे यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समिती ठ.क्र.१०७२८ दि. १०/०२/२०१५

मनपामध्ये काम करीत असणा-या समुह संघटकांना मनपा कर्मचा-यांप्रमाणे शासकीय व सार्वजनीक सुट्ट्या मंजूर करणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-----

## विधी समितीचे ठराव

**विषय क्रमांक ६ )** संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/७/कावि/११/२०१५, दि.१६/०१/२०१५
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.७६ दि.३१/०१/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये जाहिरात फलक उभारुन जाहिराती केल्या जातात. त्यावर महानगरपालिकेमार्फत जाहिरात कर, परवाना फी व जाहिरात फलक म.न.पा. जागेत असल्यास जागाभाडे आकारणी करणेत येऊन परवाना दिला जातो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ नुसार आकारण्यात येणारे परवाना फीचे दर सन २०१५ - १६ करिता निश्चित करणेकामी व महानगरपालिकेच्या उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरातीचे दरात प्रस्तावात नमुद परिशिष्ट “अ” प्रमाणे सर्व साधारण क्षेत्रासाठी परवाना फी चे दर प्रस्तावित केले आहेत. त्यामध्ये प्रस्तावात नमुद परिशिष्ट “अ” मधील अ.क्र.१ वरील जाहिरात फलक / आकाशचिन्ह (होर्डिंग्ज) / जमीनीवरील, इमारतीवरील, टेरेसवरील इ. सर्व ठिकाणचे जाहिरात फलकास सन २०१५-१६ करिता सुचविणेत आलेला दर प्रति चौरस फुट प्रतिमहा र.रु.१०/- ऐवजी प्रति चौरस फुट प्रतिमहा र.रु.१५/- अशा दुरुस्तीसह मान्यता देणेस तसेच विशिष्ट चौकांची यादी प्रस्तावात नमुद परिशिष्ट “ब” मध्ये नमुद केलेप्रमाणे परवाना फी चे दर प्रस्तावित करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ७ )** संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/७/कावि/८०२/२०१४,
दि.३०/१२/२०१४
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.७७ दि.६/०२/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३, ३७६ व उपविधीनुसार उद्योगधंदा व्यवसाय, साठा परवाने देण्यात येतात. या व्यावसायिकांकडून परवाना फी प्रती वर्षी वसुल करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ चे तरतूदीस अधिन राहून प्रति वर्षी परवाना फी चे दर निश्चित करण्यात येतात. त्यानुसार प्रचलित सन २०१४-१५ दरामध्ये १०% दरवाढ सर्व उपरोक्त तिन्ही प्रकारच्या परवान्यांसाठी करणेत येऊन सन २०१५-१६ साठी प्रस्तावित दर दर्शविणारे उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र “अ”, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र “ब”, व साठा परवाना फी साठी प्रपत्र “क” प्रमाणे दर निश्चितीस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ८ )** संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.ज.शु.के./वि/४७/२०१५,
दि.०५/०२/२०१५
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.७८ दि.६/०२/२०१५

अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत येथे टप्पा क्र. ३ व ४ योजने अंतर्गत अतिरिक्त सर्ज अरेस्टर यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणेकामी येणारा अंदाजे र.रु.१,५४,४०,०००/- ( अक्षरी र.रु.एक कोटी चौप्पन्न लाख चाळीस हजार फक्त ) चे पूर्वगननपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**विषय क्रमांक ९ )** संदर्भ :- १) मा.संजय वाबळे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव -
२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.८० दि.६/०२/२०१५

मनपाचे वाय.सी.एम.हॉस्पिटल मधील बहुतांशी कर्मचाऱ्यांची बँक खाती ही बँक ऑफ बडोदा, पिंपरी येथील मनपा मुख्य प्रशासकीय इमारत येथील शाखेत आहेत त्यामुळे तेथील कर्मचा-यांना बँक विषयक कामकाजासाठी पिंपरी येथील शाखेमध्ये यावे लागते. त्यामुळे तेथील कर्मचा-यांची गैरसोय होत आहे. वाय.सी.एम.हॉस्पिटल येथील कर्मचा-यांचे सोयीचे दृष्टीने वाय.सी.एम.हॉस्पिटल येथे बँक ऑफ बडोदाचे एटीएम चालू करणेबाबत वाय.सी.एम. हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिक्षक व पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाची मागणी आहे बँक ऑफ बडोदा ही राष्ट्रीयकृत बँक असून भारत सरकारचा उपक्रम आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे बहुतांशी आर्थिक व्यवहार याच बँकेमार्फत

हाताळले जातात. तरी मनपाचे कामकाजाचे सोयीचे दृष्टीने वाय.सी.एम.हॉस्पिटल आवारात बँक ऑफ बडोदा या बँकेस विना निविदा थेट पध्दतीने १० वर्ष कालावधीसाठी मनपा नियमानुसार येणारे

भाडे दराने एटीएम सेंटर चालू करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपाची सर्व क्षेत्रीय कार्यालये, आवश्यक दवाखाने, मनपाच्या सर्व शाळा व इतर विभागीय कार्यालयांमध्येही आवश्यकतेनुसार वाय.सी.एम.हॉस्पिटलचे धर्तीवर बँक ऑफ बडोदाचे एटीएम सुरु करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

--------

## शहर सुधारणा समितीचे ठराव

**विषय क्रमांक १०)** संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/ड-८/१/१५ दि.२०/०१/२०१५
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.३९ दि.९/०२/२०१५

मौजे पिंपळेगुरव गावाचे विकास योजनेनुसार स.नं.५१ पैकी व ५२ पैकी जागेत आरक्षण क्र.३४५, मनपा उपयोगाचे आरक्षण प्रस्तावित आहे. सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र सुमारे ४००४.७५ चौ.मी. आहे. सदर आरक्षणाचे भूसंपादन प्रस्ताव पाठविणेत आलेला असून संयुक्त मोजणी पूर्ण झालेली आहे. सदर आरक्षणाचे जागेपैकी सद्यस्थितीत टी.डी.आर.च्या माध्यमातून सुमारे ३५३९.५२ चौ.मी.जागेचा ताबा महानगरपालिकेकडे आहे. सदर जागेत नाटयगृहबांधणेचे नियोजन आहे. सदर बाबत संबंधित जागा मालक यांचे मालकीचे क्षेत्र वगळून उर्वरित ३५ गुंठेजागेत नाटयगृहाचेकाम करता येईल असे सह शहर अभियंता, स्थापत्य, ड प्रभाग यांनी त्यांचे दि.२३/०९/२०१४ चे पत्रानुसार कळविले आहे. तरी एकूण आरक्षणाचे क्षेत्र ४००४.७५ पैकी महानगरपालिकेचे ताब्यात असलेले ३५३९.५२ चौ.मी.क्षेत्र सोडून बांधकामे असलेले उर्वरित सुमारे ४६५.२३ चौ.मी.क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसारची कार्यवाही प्रस्तावित करणेत येत आहे. तरी बाधीत मिळकतधारक व स्थापत्य ड प्रभाग यांचे मागणीनुसार मौजे पिंपळेगुरव येथील स.नं.५१ पैकी व ५२ पैकी मधील आरक्षण क्र.३४५, मनपा उपयोग पैकी जागेतील सुमारे ४६५.२३ चौ.मी. क्षेत्र आरक्षणातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेकामी हरकती व सूचना मागवून अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कार्यवाही करण्याकरीता व शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-------

## मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे / कामे

**विषय क्रमांक ११)** संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.निवडणूक/१/कावि/४७/२०१५ दि. ७/२/२०१५

मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.सीईओ/एमआय एस २०१४/१०८/३३ दि.१७/११/२०१५ अन्वये मा.भारत निवडणुक आयोगाने दिलेल्या निदेशानुसार दिनांक-१/१/२०१५ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्रासह मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण मोहिमेअंतर्गत पुणे जिल्हयातील २१ विधानसभा मतदार संघातील दुबार, मयत व स्थानांतरीत मतदार यांची वगळणीसाठी प्रस्तावित असलेल्या नावांची यादी(सी.डी.) सर्वसाधारण सभेमध्ये सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणावी तसेच सदरची मतदार यादी त्यांचे निदर्शनास आणलेबाबतचा ठराव करुन सदर सभेचे इतिवृत्त व ठरावाची प्रत कार्यालयास पाठविणेबाबत मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र.पी.ई-३/जा.क्र/२६/२०१५ दि.०७/०१/२०१५ अन्वये कळविले आहे.

त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील२०५, चिंचवड, २०६, पिंपरी व २०७, भोसरी विधानसभा मतदार संघातील दुबार, मयत व स्थानांतरीत मतदार यांची वगळणीसाठी प्रस्तावित असलेल्या नांवाची यादीची सी.डी मा.महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सर्व मा.नगरसदस्यांच्या निदर्शनास आणून दिलेबाबत सर्वसाधारण सभेची मान्यता घेणेबाबत विचार करणे.

----------

## समित्यांचे अहवाल

## मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक १२)** अ) दिनांक २४/१२/२०१४ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक १४/१/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.

--------

## मा.क्रिडा समिती

**विषय क्रमांक १३)** दि. ७/१/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

## मा.अ प्रभाग समितीचे ठराव

**विषय क्रमांक १४)** संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) अ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. अप्र/११/कावि/६/२०१५ दि.०९/०१/२०१५
२) मा.अ प्रभाग समिती कडील ठ.क्र. ५१ दि. १७/१२/२०१४
३) मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव.

ट्रान्सपोर्टनगरी सेक्टर २३ लगत (देहुरोड कॅन्टोमेंट बोर्ड हद्दीत) असलेल्या "दी इंस्टिटयूट ऑफ चार्टेड अकौंटन्ट ऑफ इंडिया" या कार्यालयास सध्य स्थितीत पिण्याचे पाण्याचा नळ नाही. सदर इंस्टिटयूट ने पाण्याचे नळ मिळणेकामी विनंती केलेली आहे. पिंण्याचे पाणी ही अत्यंत महत्वाची बाब असलेने त्यांना नळकनेक्शन देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

--------

## मा.क प्रभाग समितीचे ठराव

**विषय क्रमांक १५)** संदर्भ - १) मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) क क्षेत्रीय समिति कार्यालय यांचेकडील पत्र क्र. कक्षे कावि/४/२०१५ दि.२०/१/२०१५
२) मा.क प्रभाग समिती कडील ठ.क्र. १०३ दि. ७/१/२०१५
३) मा.अतुल शितोळे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.

सांगवी वॉर्ड क्र. ५९ मधील मनपा विकास आराखडयामध्ये नमूद केलेले रस्ते रद्द करणेबाबत.

| अ.क्र. | डी.पी. मधील नमूद रस्ता | जवळील खूण |
|---|---|---|
| १ | स.नं. १४ ते २४ पर्यंत ग्रीन प्लेट लगतचा रस्ता | मधुबन कॉलनीमधील १२.०० मी.डी.पी.रस्ता |
| २ | सर्व्हे नं. ९ ते १२ (आ.क्र.३२१) चे लगतचा ९ मी.रस्ता. | ढोरेनगर मधील ९ मी. नियोजित रस्ता |

तरी या भागामध्ये उपलब्ध असणारे इतर रस्ते विकसित झाले असल्याने व वरील रस्त्यांची आवश्यकता भासत नाही तरी सदर रस्ते विकास आराखडयापासून रद्द करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

---

**टिप : १) " पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इचे संचालन करण्या विषयीचे जादा नियम " यामधील नियम क्र.१९ अन्वये करांचे दर निश्चिती संबंधी**

**होणारी चर्चा दि.१५ फेब्रुवारी २०१५ ला किंवा तत्पुर्वी समाप्त करावयास पाहिजे.**

**२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा मधील कलम ९९ अन्वये करांचे दर दि.२० फेब्रुवारी २०१५ ला किंवा तत्पुर्वी निश्चित केले पाहिजेत.**

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/९/कावि/ ४३ /२०१५
दिनांक : ११/०२/२०१५

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

## माहे फेब्रुवारी २०१५ चे मा.महापालिका सभेमध्ये मा.जावेद शेख यांना विचारावयाचे प्रश्न -

**प्रश्न क्रमांक - १)** महानगरपालिकेत काम करणा-या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील कनिष्ठ अभियंता व उपअभियंता या पदावर काम करीत असलेल्या अभियंत्यांनी महापालिका प्रशासनापुढे पदोन्नतीच्या नियमांबाबत निवेदने सादर केली आहेत, त्या बाबत सदर प्रश्नांचे निरसन करण्यासाठी प्रशासनाने काय कार्यवाही केली आहे ?

**प्रश्न क्रमांक - २)** महापालिकेने सर्व अभियंतांची नेमणूक कनिष्ठ अभियंता या पदावर एकच स्पर्धापरिक्षा घेऊन केलेली असतांना व सेवाजेष्ठ्तेबाबत शासनामध्ये शैक्षणिक अर्हतेनुसार वेगवेगळया याद्या तयार करण्याची पध्द्त नसतांनाही महापालिकेने शैक्षणिक अर्हतेनुसार वेगवेगळया सेवा जेष्ठता यादया कोणत्या नियमानुसार तयार केल्या आहेत ? महानगरपालिकेच्या विदयुत विभागाच्या सेवाजेष्ठता यादया शैक्षणिक अर्हतेनुसार वेगवेगळया केलेल्या नाहीत हे खरे आहे काय ?

**प्रश्न क्रमांक - ३)** महापालिकेतील कनिष्ठ अभियंता स्थापत्य व उपअभियंता स्थापत्य या संवर्गाच्या सेवाजेष्ठता यादया यापुर्वी संपूर्ण केव्हा तयार करण्यात आल्या होत्या ?

**प्रश्न क्रमांक - ४)** सेवेमध्ये असतांना ज्या अभियंतांनी पदवी प्राप्त केली आहे त्यांच्यासाठी असलेल्या ३/८ सेवेचा लाभ सेवाजेष्ठतेमध्ये मिळणेबाबतचा नियम सन १९९७ मध्ये शासनाने रद्द केलेला असल्यानंतरही मनपामध्ये काही अभियंतांना असा लाभ देऊन नियमबाहय पदोन्नती देण्यात आलेली आहे त्यामुळे सेवाजेष्ठ पदविकाधारक अभियंतांचा हक्क डावलला गेला आहे हे खरे आहे काय ?

**प्रश्न क्रमांक - ५)** मा.विधीसमिती ठराव क्र. १५० दि.८/१२/२०१० व मा.महापालिका सभा ठराव क्र. १११३ दि.१८/३/२०१० अन्वये पदविकाधारक अभियंता व पदवीधारक अभियंता यांची एकत्रित सेवाजेष्ठता यादी करुन त्या नुसार सेवाजेष्ठतेने पदोन्नती देणे बाबत मान्यता दिलेली आहे. मा.आयुक्तांनी सदर ठरावांच्या आधारे महापालिकेच्या सर्व संवर्गाचे सेवाप्रवेश नियमावलीमध्ये सुधारणा करुन ती प्रसिध्दीस दिलेली आहे. सदर ठरावाची अंमलबजावणी महापालिका प्रशासनाने अदयाप केलेली नाही हा मा.महापालिका सभेचा अवमान नाही काय ?

## माहे फेब्रुवारी २०१५ चे मा.महापालिका सभेमध्ये मा.विनोद जयवंत नढे यांना विचारावयाचे प्रश्न -

**प्रश्न क्रमांक - ६)** महापालिकेमध्ये स्थापत्य विभागामध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर भरती करतांना शैक्षणिक अर्हता स्थापत्य अभियांत्रिकीची पदविका अथवा पदवी अशी देण्यात आलेली आहे. उपअभियंता व कार्यकारी अभियंता या पदांची मंजूरी देतांना या पदांसाठी खालच्या पदावरुन पदोन्नतीने नेमणूक करतांना शासनाने स्थापत्य अभियांत्रिकीची पदविका अथवा पदवी अशी अर्हता व पदवीकाधारकांसाठी ७ वर्षे व पदवीधारकांसाठी ५ वर्षे सेवा काळ पुर्ण करणे या अटी दिलेल्या आहेत हे खरे आहे काय ? असे असुनही मनपा प्रशासनाने नियमबाहयरित्या करुन पदोन्नतीसाठी पदवी व पदविका अभियंता यांचे १:१ असे प्रमाण लावणे बेकायदेशीर नाही काय ?

**प्रश्न क्रमांक - ७)** शासनाचे दि. २० ऑक्टोबर १९९९ चे पत्र महापालिकेस प्राप्त झाल्याचे वेळी महापालिका प्रशासनाने याचिका क्र. २४३१/१९९४ वरील मा.उच्च न्यायालयाचा निर्णय शासनाचे निर्दशनास आणून दिला होता काय ? मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये याचिकाकर्ते पाटबंधारे विभागाच्या १९७० च्या शासन निर्णयामध्ये १:१ हे प्रमाण सिध्द करु शकले नाहीत असे नमुद केलेले असतांना, व दि. २० ऑक्टोंबर १९९९ चे पत्र शासनाने दि. २७ जुलै २००२ च्या पत्रान्वये रद्द केलेले असतांना तसेच महापालिका प्रशासनाने पदवीधारक व पदविकाधारक यांच्यासाठी १:१ हया प्रमाणाने पदोन्नती दिल्या आहेत हे खरे आहे काय ? या अनियमिततेस कोण जबाबदार आहे ?

**प्रश्न क्रमांक - ८)** वरील प्रमाणे अनियमितता झाली असल्याचे शासनाच्या नगरविकास विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे शासनाने दि १८/११/२०१४ चे पत्रान्वये महापालिकेकडून अहवाल मागविला असतांनाही व सदर बाबत शासनाने स्मरणपत्रे दिलेली असतांनाही महापालिका प्रशासनाने अदयाप अहवाल पाठविलेला नाही हे खरे आहे काय ? असल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**प्रश्न क्रमांक - ९**) मा.महापालिका सभा ठराव क्र. १११३ दि. १८/३/२०११ अन्वये पदवी व पदविकाधारक अभियंतांची एकत्रीत सेवाजेष्ठता यादी तयार करुन त्याप्रमाणे १०० टक्के पदोन्नतीने (विदयुत विभागाप्रमाणे) देणेस मान्यता दिलेली आहे. मा.उच्च न्यायालयाचे निर्णयांमध्ये पाटबंधारे विभागाच्या १९७० च्या शासन निर्णयामध्ये १:१ हे प्रमाण नाही असे नमुद केलेले असताना शासनाने या प्रकरणी स्मरणपत्रे देवूनही शासनास अहवाल पाठविलेला नाही म्हणजेच महापालिका प्रशासन मा.उच्च न्यायालय मा.महापालिका सभा व महाराष्ट्र शासन यांनाही जुमानत नाही व अवमान करत आहे. असे सिध्द होत नाही का ? व त्यास कोण जबाबदार आहे ?

**प्रश्न क्रमांक - १०**) महापालिका प्रशासन चुकीच्या व अन्याय्य नियमांन्वये पदोन्नतीची कार्यवाही करत आहे व त्यामुळे ३० वर्षे सेवा करुनही पदवीधारक अभियंतांपेक्षा कमी सेवा झालेल्या पदवीधरक अभियंताच्या हाताखाली काम करावे लागून मानसिक मनोधैर्य खच्ची करण्याचे काम महापालिका प्रशासन करत आहे व हा अन्याय प्रशासन केव्हा दुर करणार आहे ?

---

## माहे फेब्रुवारी २०१५ चे मा.महापालिका सभेमध्ये मा.किरण बाळासाहेब मोटे यांना विचारावयाचे प्रश्न -

**प्रश्न क्रमांक - ११**) महापालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता स्थापत्य व उप अभियंता स्थापत्य या संवर्गाची सेवाजेष्ठता यादी ही अंतीम करण्यात आलेली नाही. हे खरे आहे काय ? सदरची यादी शेवटची केव्हा प्रसिध्द करण्यात आली होती ? महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व विभागांच्या संवर्गाच्या सेवाजेष्ठता यादया महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ च्या नियमाप्रमाणे तयार करण्यात येतात काय ? महापालिकेत सर्व विभागाच्या सर्व पदांना वरिल नियम लागू आहेत काय ?

**प्रश्न क्रमांक - १२**) महापालिकेत कनिष्ठ अभियंता पदावर निवड करतांना पदवीधर अभियंता व पदविकाधारक अभियंता यांच्यासाठी वेगळे निकष लावण्यात आले होते काय ? पदवीधर अभियंता व पदविकाधारक अभियंता यांची कनिष्ठ अभियंता पदावर भरती करताना वेगवेगळा कोटा मंजूर करण्यात आला होता काय ? पदवीधर अभियंता व पदविकाधारक अभियंता यांच्यासाठी वेगवेगळे रोस्टर मंजूर करण्यात आले आहे काय ?

**प्रश्न क्रमांक - १३**) महापालिकेतील स्थापत्य विभागाच्या कनिष्ठ अभियंता व उपअभियंता या पदांच्या सेवाज्येष्ठता यादया शैक्षणिक अर्हतेनुसार वेगवेगळया केलेल्या आहेत त्या कोणत्या नियमानुसार केलेल्या आहेत ? सामान्य प्रशासन विभागाने एकाच तुकडीत निवड झालेल्यांची सेवाजेष्ठता यादी शैक्षणिक अर्हतेनुसार वेगवेगळी करणेची पध्दत शासनात नाही असे महापालिकेस कळविले आहे काय ? असल्यास महापालिकेत सेवाजेष्ठता यादया शैक्षणिक अर्हतेनुसार वेगवेगळया करण्यामुळे शासन मंजूर रोस्टरच्या नियमाप्रमाणे पदोन्नती देतांना बेकायदेशीरपणा झाला आहे हे खरे नाही काय ?

**प्रश्न क्रमांक - १४**) मा.उच्च न्यायालयातील याचीका क्र. २४३१/१९९४ वरील निर्णयामध्ये पाटबंधारे विभागाच्या १९७० च्या नियमामध्ये पदवीधारक व पदविकाधारक यांच्यामध्ये १:१ हे प्रमाण याचिकाकर्ते सिध्द करु शकले नाहीत असे नमुद आहे हे खरे आहे काय ? व याचिकाकर्ते हे ते कनिष्ठ अभियंता या पदावर रुजू झाले त्यावेळी असलेल्या प्रचलीत नियमानुसार पात्र आहेत असा निर्णय दिलेला आहे हे खरे आहे काय ? वरील प्रमाणे मा. उच्च न्यायालयाचा निर्णय असताना

त्यानंतर पदविधारक व पदविकाधारक यांच्यामध्ये १:१ हया प्रमाणानुसार पदोन्नती देण्यात आलेल्या आहेत त्या मुळे मा. उच्च न्यायालयाचा महापालिकेकडून अवमान झाला असे म्हणता येणार नाही काय?

**प्रश्न क्रमांक** - **१५**) शासनाने कनिष्ठ अभियंता स्थापत्य व उपअभियंता स्थापत्य या संवर्गाच्या सेवाजेष्ठता व पदोन्नती बाबत सविस्तर अहवाल नगरविकास विभागाने दि. १८/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये मागविला आहे हे खरे आहे काय ? मागविला असल्यास सदरचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे काय ? शासनाने स्मरणपत्रे पाठवूनही अहवाल दिला नसल्यास न पाठविण्याचे कारणे काय आहेत ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

## माहे फेब्रुवारी २०१५ चे मा.महापालिका सभेमध्ये मा.अनंत सुभाष को-हाळे यांना विचारावयाचे प्रश्न -

---

**प्रश्न क्रमांक- १६)** मार्च २०१२ ला मनपा सर्वसाधारण सभा गठीत झालेनंतर जे आजपर्यंत एकूण किती वेळा मनपा सर्वसाधारण सभेचे कामकाज पूर्णपणे पार पडले ? त्याचा तपशिल द्यावा.

**प्रश्न क्रमांक- १७)** मार्च २०१२ ला विद्यमान मनपा सर्वसाधारण मासिक सभांचे कामकाज आजपर्यंत पार पाडतांना मासिक सर्वसाधारण सभा किती वेळा तहकूब केली ? का तहकूब केली ? याचा सविस्तर तपशिल कारणासहीत द्यावा.

**प्रश्न क्रमांक- १८)** महापालिकेच्या असणा-या विविध विषय समित्या अनुक्रमे मा.स्थायी समिती, मा.महिला व बालकल्याण समिती, मा.विधी समिती, मा.शहर सुधारणा समिती, मा.क्रीडा समिती व मा.शिक्षण मंडळ यांच्या विद्यमान मनपा मार्च २०१२ मध्ये गठीत झालेनंतर वरील नमुद विषय समित्या व मा.शिक्षण मंडळ गठीत झालेनंतर ते आजपर्यंत या सर्वांच्या एकूण किती मासिक सभा पार पडल्या. त्यांचा तपशिल द्यावा तसेच या विषय समित्यांचे व शिक्षण मंडळाचे मासिक सभांचे कामकाज किती वेळा तहकूब व रद्य झाले याचा तपशिल कारणासहित द्यावा.

**प्रश्न क्रमांक- १९)** मार्च २०१२ मध्ये विद्यमान मनपा गठीत झालेनंतर झालेल्या मासिक सर्वसाधारण सभांवर आजपर्यंत एकूण किती खर्च झाला ? त्याचा तपशिल द्यावा.

**प्रश्न क्रमांक- २०)** प्रश्न क्र.३ मध्ये नमूद विविध विषय समित्या व मा.शिक्षण मंडळ यांच्या कामकाजावर विद्यमान मनपा मार्च २०१२ मध्ये गठीत झाल्यावर यांच्या कामकाजावर एकूण किती खर्च झाला ते द्यावे.

-----------------------------------------------------------------------------------------------------------